नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. ६**

**ऑगस्ट २००९**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २००९ रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजीमहाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**स्थायी समितीचे ठराव**

<u>विषय क्रं. ७०</u>

संदर्भ :– १) मा. चौकशी अधिकारी यांचा खाचौ/एसआर/२६/०७,दि.१/११/२००७ चा निष्कर्ष अहवाल.

२) कारणे दाखवा नोटीस जा. क्र. सहमआ/खाचौवि/१०१७, दि. १६/११/२००७.

३) कारणे दाखवा नोटीस जा. क्र. सहमआ/खाचौवि/७, दि. ३/४/२००८.

४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उका/खाचौवि/१२५,दि.२९/४/२००८ चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्रं. २४८,दि.२७/५/२००८.

६) मनपा ठराव क्र. २६१, दि. २०/१०/२००८.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

श्री. भारत सदाशिव मोरे, नर्सिंग ऑर्डली, आरोग्य विभाग यांचे विरुध्दचे खातेनिहाय चौकशीप्रकरणी त्यांचे विरुध्द सिध्द होत असलेल्या आरोपाचे परिणामी कारणे दाखवा नोटीशीमध्ये प्रस्तावित केलेली शिक्षा कायम करुन त्यांना मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार मनपा सेवेतून काढून टाकण्यास (Removal from Municipal Service) व तशा आशयाचे आज्ञापत्र मा.अति.महा.आयुक्त(ज) यांच्या स्वाक्षरीने प्रसुत करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑगस्ट २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ३०, दि. २३/६/२००९ चा झाला आहे.)

<u>विषय क्र. ७१</u>

संदर्भ :– १) शासन निर्णय क्र. सीडीआर–१३०७/प्र.क्र.३/०७/११/–अ दि. १८/१०/२००७.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७.

३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/७९ दि. १७/४/२००८ चे पत्र.

४) विधी समिती ठराव क्र. ९ दि. ७/५/२००८.

५) स्थायी समिती ठराव क्र. ५७२, दि. २२/७/२००८.

६) मनपा ठराव क्र.३८२, दि. १८/१२/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन व स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्याकडील सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ निलंबित असलेल्या सेवक/अधिकारी यांना कामावर रुजू करुन घेणेस व सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी ७५% निर्वाह भत्ता देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७ मधील शासनाच्या नियमाप्रमाणे सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी ७५% निर्वाह भत्ता देणे यासाठी याबाबत प्रचलित मनपा सेवाविनियम क्र. ५८ मध्ये दुरुस्ती करुन मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्टाप्रमाणे येथून पुढे कार्यवाही करणेस

२) मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७ मधील या प्रकरणी निलंबित झालेल्यांसाठी जर सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ निलंबित असेल व दोषारोप सादर केले नसेल आणि पद रिक्त राहत असेल तर दोषारोप सादर होईपर्यंतच्या काळात रुजु करुन घ्यावे याबाबत मे.राज्य शासनाकडून प्रसृत करण्यात आलेल्या अथवा याबाबत मे.राज्य शासनाकडून वेळोवेळी प्रस्तुत करण्यात येणाऱ्या शासन

आदेशामधील मार्गदर्शक तत्वांनुसार पुणे महानगरपालिकेमधून निलंबित झालेल्या सेवक/अधिकारी यांचे निलंबन मागे घेणेबाबतची कार्यवाही करणेस

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑगस्ट २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ३१, दि. २३/६/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. ७२**

संदर्भ :– १) संरक्षण खात्याने दिलेले ना हरकत पत्र क्रमांक एफ क्रं.१३०१५/४/२००८/डी (लॅन्डस), दि.१७/३/२००८.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२४८ दि. ६/११/२००८.

३) मा. मुख्य सभा ठराव क्रं.२६६,दि.२०/१०/२००८.

४) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/जनेराशपुअ/१४७ दि. १६/६/२००९ चे पत्र.

५) मा. विशेष कार्याधिकारी (तां.सं.)प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (ज.ने.रा.श.पु.अ.) यांचे जा. क्र. ६०९, दिनांक २०/७/२००९ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३०७ दि. २३/६/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे आळंदी रस्त्याचे मान्य विकास आराखड्यानूसार ६० मी.चे रूंदीकरणाकरीता आवश्यक असणाऱ्या सरंक्षण खात्याच्या जागेवर प्रत्यक्ष काम करणेसाठी मे.भारत सरकार ने पत्र क्रमांक एफ क्रं.१३०१५/४/२००८/डी (लॅन्डस),दि.१७.३.२००८ नुसार ना हरकत दिलेली आहे. या ना हरकत पत्रातील अटी शर्तीनुसार सरंक्षण खात्याची रस्तारूंदीतील बाधित बांधकामे पुणे महानगरपालिकेने बांधून द्यावयाची आहेत.

संदर्भ क्रमांक २चे ठरावन्वये या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून ४,०९,२८,४००/– पर्यंत टेंडर दराने काम करुन घेणेस मान्यता मिळालेली आहे. सदरचे कामाकरीता अंदाजपत्रकात करणेत आलेल्या तरतूदीनुसार आवश्यक रक्कम अर्थशिर्षक उए२०अ१२२४ वर उपलब्ध न झाल्याने ज.ने.रा.श.पु.अ.कडे सदरचे कामाकरीता पुरेसा निधी उपलब्ध नाही.

तरी सदरची रक्कम रुपये ४,०९,२८,४००/– ही रक्कम भुमीप्रापण विभागाकडील भूमी संपादन निधीतून करावयाचा खर्च FE११अ१०२ या अर्थशिर्षकावरुन CE२०अ१२२४ या अर्थशिर्षकावर वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ७३**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे मआ/भूसंपादन/१९१, दि. ८/७/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३८४, दि. २४/७/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपा मुख्य इमारतीच्या आवारातील वाहनतळ ५ वर्षे मुदतीसाठी चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ६ निविदांमध्ये ठेकेदार मे.विवेक एंटरप्राईजेस यांची निविदा सर्वात जास्त रक्कमेची म्हणजेच मनपा अपेक्षित र.रूपये ४५,०००/– पेक्षा २१,७८६/– ने जास्त रकमेची र.रूपये ६६,७८६/– दरमहा या दराची असल्याने सदरचे वाहनतळ विवेक एंटरप्राईजेस यांनी दिलेली सर्वात जास्त र.रूपये ६६,७८६/– ( यात प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ ) स्विकारून त्यांना निविदा शर्ती अटीप्रमाणे चालविणेस देणेकरिता त्यांचेबरोबर करारनामा करणेस तसेच सदरच्या वाहनतळाची मुदत ताबा दिनांकापासून ५ वर्षे ठेवण्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७४**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त ठराव क्र.६/१७४, दि. ३१/८/२००४

२) कार्यालय परिपत्रक जा.क्र.ओ/२३७७, दि. ३१/८/२००४

३) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/ओ/१९०, दि. ८/७/२००९

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३९२, दि. २४/७/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे महानगरपालिकेच्या आयात सिमेतून जो माल परत येण्याच्या उद्देशाने हद्दीबाहेर पाठविला जातो त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यासाठी दोन महिन्याला रू. १००/– ऐवजी किमान रूपये ५००/– ते कमाल रूपये १०००/– याप्रमाणे तसेच त्यापुढील प्रत्येक दोन महिन्याच्या दोन मुदतवाढीसाठी प्रत्येकी किमान रूपये ५००/– ते कमाल रूपये १०००/– याप्रमाणे परतीच्या मालावरील

नोंदीसाठीचा लेखनिक खर्च पावती आकारणीच्या रकमेमध्ये वाढ करण्यास व सन २००९–१० या आर्थिक वर्षासाठी किमान दराने आकारणी करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४,४५५ व कलम १४९ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

महाराष्ट्र शासनाची मान्यता घेऊन सरकारी राजपत्रात प्रकटन प्रसिध्द केल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

**विषय क्र.७५**

संदर्भ :– १) मा.सौ.विद्या भोकरे व मा.बाबु वागसकर यांचे दि. १०/७/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठ.क्र. ३९८, दि. २८/७/२००९

––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

उपायुक्त गवनि यांचे नियंत्रणाखाली असणाऱ्या चाळ विभाग, मंडई विभाग, निवडणूक विभाग, रेकॉर्ड विभाग यांचे संगणकीकरण करणेसाठी र.रुपये ५० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, ड.सांख्यिकी व सगंणक कार्यालय, पान क्र. ४८, अ.क्र. ३, विशेष प्रकारचे हिशोबी काम कॉम्प्युटरमार्फत करुन घेणे, ई.आर.पी.अंमलबजावणी, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेटा एन्ट्री, सेवकांना प्रशिक्षण खर्च जी.आय.एस., वर्क्स मॅनेजमेंट सिस्टीम, क्लुऑक्स व तदनुषंगिक कामे करणे (मुले) (आरई ११एन १०३), मान्य तरतूद र.रुपये ५ कोटी ५० लाख | ५० लाख | ––– |
| नविन सुचविलेली कामे | | |
| चाळ विभाग | ––– | १० लाख |
| मंडई विभाग | ––– | १० लाख |
| निवडणूक विभाग | ––– | २० लाख |
| रेकॉर्ड विभाग | ––– | १० लाख |

**विषय क्र.७६**

संदर्भ :– १) स्थायी समिती ठराव क्र. ५२६ दि. १/७/२००८

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. १२१ दि. १७/७/२००८

३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नावियो/१९८ दि. १५/७/२००९ चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठ.क्र. ४१६, दि. २८/७/२००९

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

अंदाजपत्रकातील मान्य तरतुदीमधून र.रुपये ४ कोटीचे वर्गीकरण उद्यान विभाग, सन २००८–०९ भांडवली कामे, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये वगैरे, १) १२.नव्याने समाविष्ट झालेल्या गावांत उद्याने विकसित करणे, सीई२६अे–२२८ र.रुपये २ कोटी २) खडकवासला धरण काठ संरक्षण करणे व परिसर सुधारणा व उपवन विकसित करणे सीई२६अे–३५२ र.रुपये १ कोटी ३) सिंहगड किल्ला परिसर सुधारणा प्रकल्प सीई२६अे–३५३ र.रुपये १ कोटी या खात्यातुन नागरवस्ती विकास योजना, मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक योजना व लोकशाहिर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक योजना अंतर्गत खुल्या वर्गातील ८०% व अधिक मार्कस असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य देणेसाठी लागणारी रक्कम या खात्याकडे वर्ग करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. ७७**

संदर्भ :– १) मा.बापूसाहेब पठारे व मा.सुनिल बिबवे यांचे दि. २३/७/२००९ चे पत्र

२) मा.स्थायी समिती ठ.क्र. ४२२, दि. २८/७/२००९

––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

आंतरराष्ट्रीय कुस्ती महासंघाच्या मान्यतेने आणि भारतीय कुस्ती महासंघ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच आशियाई कॅडेट कुस्ती स्पर्धा आयोजन करण्याचा बहुमान महाराष्ट्राला मिळाला आहे. या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा दि. ३० जुलै ते २ ऑगस्ट २००९ या कालावधीत शिवछत्रपती क्रिडानगरी, म्हाळूंगे, बालेवाडी, पुणे येथे संपन्न होत आहे. सदर आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा ग्रीकोरोमन, फ्री स्टाईल व महिला या तीन प्रकारात होणार असून या स्पर्धेमध्ये आशियाई खंडातील १५ राष्ट्रातील ४००

कुस्तीगीर, ५० आंतरराष्ट्रीय पंच, १० राष्ट्रीय पंच व आंतरराष्ट्रीय निरिक्षक आणि पदाधिकारी सहभागी होणार आहेत. सदरची स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अंदाजे र.रुपये २,२२,००,०००/- (दोन कोटी बावीस लाख) एवढा खर्च अपेक्षित आहे.

सदर आंतरराष्ट्रीय स्पर्धा यशस्वी होण्यासाठी पुणे महानगरपालिकेतर्फे र.रुपये ११ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं.७८**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसंपादन/२०८ दि. २३/७/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र. ४३३, दि. २८/७/२००९

----

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे महानगरपालिकेच्या मालकीचे पुणे पेठ पर्वती स.नं. ८५/८६ सहकारनगर येथील क्रिडासंकूल (बॅडमिंटन हॉलसह) भाडे तत्वावर चालविणेस देणेबाबत निविदा मागवल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी श्री.रमेश अशोक शेलार यांची निविदा मनपा अपेक्षित रकमेपेक्षा सर्वात जास्त म्हणजेच मासिक भाडे र.रुपये २३,००१/- इतकी असल्याने त्यांना पर्वती स.नं. ८५/८६ सहकारनगर येथील क्रिडासंकूल बॅडमिंटन हॉलसह सर्व सोयीने युक्त क्षेत्रफळ ६४६.९८ चौ.मी. ताबा दिनांकापासून ३० वर्षे कालावधीसाठी मासिक भाडे र.रुपये २३,००१/- स्विकारुन भाडे तत्वावर चालविणेस देणेस, मासिक भाडे प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस, याकरिता त्यांचेशी आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे अन्य शासकीय सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्याचे मासिक भाडे रक्कम आगाऊ स्विकारणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं.७९**

संदर्भ :- १) मा.शाम देशपांडे यांचे दि. १५/११/२००८ चे पत्र.
२) मा.पक्षनेते सभेचा दि. ८/७/२००९ चा निर्णय
३) मा.स्थायी समिती ठ.क्र. ४३४, दि. २८/७/२००९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

आद्य क्रांती गुरु लहुजी वस्ताद साळवे यांची जयंती प्रतिवर्षी साजरी करावी व प्रतिवर्षी लहुजी वस्ताद तालीम, गंज पेठ, पुणे येथे स्टेज, मंडप, स्पीकर्स लावणे इ. व्यवस्था करावी तसेच सदर प्रसंगी शहरातील मान्यवर व्यक्तींचा शाल, स्मृतिचिन्हे व श्रीफळ देवून सन्मान करावा. सदर समारंभासाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद प्रतिवर्षी करण्यास तसेच धोरण ठरविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं.८०**

संदर्भ :- १) मा.सुनिल बिबवे, मा.शैलेंद्र नलावडे, मा.चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर, मा.दिपक मानकर, मा.दिपक बोडके व मा.मोहनसिंग राजपाल यांचे दि. ३/२/२००९ चे पत्र.
२) मा.पक्षनेते सभेचा दि. ८/७/२००९ चा निर्णय
३) मा.अनिल भोसले, सभागृह नेता, मा.सुनिल बिबवे, मा.अनिल जाधव, मा.बाबु वागसकर व मा.हनिफ शेख यांचे दि. २८/७/२००९ ची उपसूचना
४) मा.स्थायी समिती ठ.क्र. ४३५, दि. २८/७/२००९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे सातारा रस्त्यावर स्वामी विवेकानंद यांचा पुर्णाकृती पुतळा असून याठिकाणी स्वामी विवेकानंद जयंती व पुण्यतिथी दरवर्षी स्वामी विवेकानंद स्मारक समितीतर्फे साजरी केली जाते. तरी युवकांना प्रोत्साहन देण्याकरीता दरवर्षी स्वामी विवेकानंद जयंती पुणे महानगरपालिकेतर्फे साजरी करण्यात यावी तसेच या महोत्सवानिमित्त सांस्कृतिक व व्याख्यान कार्यक्रम राबविण्याकरिता पुणे महानगरपालिकेतर्फे अंदाजपत्रकामध्ये र.रुपये २ लाख रुपयांची तरतूद करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सदरची रक्कम सामाजिक उपक्रमासाठी उपयोगात येणार आहे.

**<u>विषय क्रं.८१</u>**

संदर्भ – १ राष्ट्कुल यूवा क्रिडा स्पर्धा समितीचे सहनिमंत्रक यांचे दि. १८/१२/२००८ चे पत्र.
२ मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(स.क.)/१२४२ दि. २०/१/२००९ चे पत्र.
३ स्थायी समिती ठराव क्र. १९५४ दि. २०/१/२००९
४ मुख्य सभा ठराव क्र. १४ दि. २१/५/२००९
५ मा.सौ.मेधा कुलकर्णी,मा.अशोक येनपुरे,मा.हनिफ शेख यांचे दि.२८/७/२००९चे फेरविचाराचे पत्र
६ मा.स्थायी समिती ठ.क्र. ४४१ त्वर्य, दि. २८/७/२००९

----

स्थायी समिती ठराव क्र. १९५४ दि. २०/१/२००९ चा फेरविचार करण्यात आला.

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

राष्ट्रकुल युवा क्रिडा स्पर्धेकरीता भारतीय संघातील महाराष्ट्राच्या खेळाडूंना पंडित नेहरु स्टेडियम विभागाकडील २००९–१० च्या अंदाजपत्रकातील प्रस्तावित तरतुदीमधून पुढील तीन वर्षांसाठी संदर्भाकिंत क्र. ३ च्या ठरावात कृणाल राजेंद्र भोसले, जलतरणपटू या नावाचा समावेश करुन त्यास प्रतिवर्षी एक लाख रुपये शिष्यवृत्ती देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक – सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १७–खेळ व क्रिडांगणे, क–पंडित नेहरु स्टेडियम, २३–आंतरराष्ट्रीय खेळाडूंना सराव करणे, साहित्य खरेदी करणे, अनुषंगिक खर्चासाठी निधी उभारणे.
(याबाबत यापुर्वी झालेला स्थायी समिती ठराव क्र.१९५४ दि. २०/१/२००९ चा दुरुस्त करण्यात येत आहे.)

**<u>विषय क्रं.८२</u>**

संदर्भ – १ मा.निलेश निकम, अध्यक्ष, स्थायी समिती व मा.अनिल भोसले, सभागृह नेता यांचे दि. २८/७/२००९ चे पत्र.
२ मा.स्थायी समिती ठ.क्र. ४४२ त्वर्य, दि. २८/७/२००९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ५३ पत्रकारनगर रोड येथे मुतारी बांधणेसाठी र.रुपये ३ लाख व महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनासाठी र.रु. ४ लाख असे एकूण र.रुपये ७ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, सीपीटीएल ८/११ एफई१४अे ११८/डब्ल्यू५–४६२, वॉर्ड क्र. ५३ पत्रकारनगर रस्ता येथे स्वच्छतागृह बांधणे | ७ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ५३ पत्रकारनगर रोड येथे मुतारी बांधणे | --- | ३ लाख |
| २) महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनासाठी | --- | ४ लाख |

**<u>विषय क्रं.८३</u>**

संदर्भ – १ मा.विरेंद्र किराड यांचे दि. २४/७/२००९ चे पत्र.
२ मा.स्थायी समिती ठ.क्र. ४४३ त्वर्य, दि. २८/७/२००९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ७८ मध्ये श्री अक्कलकोट स्वामी समर्थ बाल उद्यान येथील सांस्कृतिक भवन (सभा मंडप) व पहिल्या मजल्यावरील हॉलचे विविध कामाकरीता वापरणे व कामे करणेसाठी र.रु. ३६.५० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, | | |
| २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. १२०, अ.क्र. १३३, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळेमध्ये विकासाची कामे करणे, (यादी एस–२३), पान क्र. २४६, अ.क्र. १५, वॉर्ड क्र. ७८ मधील महाराणा प्रताप शाळेचा हॉल दुरुस्त करणे | ५ लाख | --- |
| ७.रुग्णालये, प्रसुतिगृहे व औषधालये, पान क्र. १३२, अ.क्र. ३०, शहरात दवाखाने व रुग्णालयांमध्ये विविध विकासाची कामे करणे, (यादी एस–२५), | | |

| | | |
|---|---|---|
| पान क्र. २४८, अ.क्र. ५, वॉर्ड क्र. ७८ मध्ये कै.रोहिदास किराड दवाखाना रंगरंगोटी करणे | ५ लाख | --- |
| १२. भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६४, अ.क्र. ८८, शहरात विविध ठिकाणी समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी एस-१६), पान क्र. २५३, अ.क्र. ९७, वॉर्ड क्र. ७८ मध्ये मनपा शाळा क्र. १० मौलाना अबुल कलाम आझाद शाळा येथे हॉल बांधणे | १० लाख | --- |
| पान क्र. २५३, अ.क्र. ९८, वॉर्ड क्र. ७८ मध्ये समाज मंदिर बांधणे | १० लाख | --- |
| क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, (सीई२२अे११४/डब्ल्यू४-४८८), सीपीटीएल ९-३०/५१, वॉर्ड क्र. ७८ मध्ये मौलाना आझाद शाळेत वर्गखोल्या रंगविणे | २.५० लाख | --- |
| क्षेत्रिय कार्यालयाने नागरिकांच्या सहभागातून करावयाची कामे, (सीई२२अे५४७/सी४-२०२), सीटीझेड ९-३०/४९, वॉर्ड क्र. ७८ मध्ये १९७/९८ बाबुभाई उर्दु शाळा रंगरंगोटी करणे | ४ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ७८ मध्ये श्री अक्कलकोट स्वामी समर्थ बाल उद्यान येथील सांस्कृतिक भवन (सभा मंडप) व पहिल्या मजल्यावरील हॉलचे विविध कामाकरीता वापरणे व कामे करणे | --- | ३६.५० लाख |

## शहर सुधारणा समितीचा ठराव

<u>विषय क्रं.८४</u>

संदर्भ :- १) मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई ३२ यांचेकडील आदेश क्र. टीपीएस १८०३/२०४५/नवि-१३, दि. २४/८/२००४.

२) मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, यांचेकडील जा.क्र. टीपीएस १८०३/२०४५/नवि-१३, दि. ७/५/२००५.

३) मा.संस्थापक, माईर्स एम.आय.टी.पुणे यांचे दि. १६/९/२००६ चे पत्र.

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/८७९, दि. १२/१२/२००८.

५) मा.शहर सुधारणा ठराव क्र.४७९, दि. ३१/३/२००८.

६) मा.बंडू केमसे व मा.संतोष आरडे यांचे दि.२.१२.०८ चे फेरविचाराचे पत्र.

७) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १९९, दि. १६/१२/२००८.

---

मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.४७९, दि. ३१.३.०८ चा फेरविचार करण्यात आला.

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

मे.शासनाचे संदर्भ क्र. १ व २ चे आदेशानुसार कोथरूड स.नं.१२४ मधील एम.एन.या अद्याक्षराने दर्शविलेल्या मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतचे शासनाच्या नकाशातील १२.० मी.रूंद .डी.पी.रस्ता वगळणेबाबतची कलम ३७(१) अन्वये कार्यवाही सुरू करणेसाठी मान्यता द्यावी, अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

(टिप - मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.४७९, दि. ३१.३.०८ चा निरस्त करण्यात येत आहे. )

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे ऑगस्ट २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४०, दि. २३/६/२००९ चा झाला आहे.)

<u>विषय क्र.८५</u>

**संदर्भ -** १) शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि.२३/१०/२००८ रोजीच्या शासन निर्णयासोबतची नोटीस क्र. टीपीएस १८०८/१५०३ प्र.क्र.१३५७/०८/नवि-१३ (राजपत्रात प्रसिध्द दि. २७/११/०८)

२) मा.उप संचालक, नगर रचना पुणे, विभाग पुणे यांचेजा.क्र.वि.नि.नि./फेरबदल/कलम ३७(१) (अेअे) अपेडिंक्स आर ७/नियम क्र.८/पुणे मनपा/उसंपुवि/१६६, दि. २३/१/०९

३) मा.उपसंचालक, नगर रचना विभाग, पुणे यांना पुणे म.न.पा.कडून दिलेले पत्र जा.क्र.४०२१, दि. १५/१२/०८

४) मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/९२, दि.२९/५/२००९ चे पत्र.

५) शहर सुधारणा समिती ठ.क्र.९१, दि. १७/७/२००९

**विषय -** पुणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर

रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) (अे अे ) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेली सूचना मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील परिशिष्ट आर–७ मध्ये अ.क्र.८ येथे ई.डब्ल्यू.एस.हौसिंगकरिता असलेला नियम सुधारित करणेबाबत फेरबदलाच्या प्रस्तावाबाबत.

----

**मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –**

PHADA करिता आरक्षित क्षेत्राचे विकसन करताना पुणे महानगरपालिकेस मिळणारे क्षेत्र म्हणजेच १५% क्षेत्राचा टी.डी.आर.पुणे महानगरपालिकेकडून देणे व उर्वरित १५% क्षेत्र हे PHADA या संस्थेस प्राप्त होणार असल्याने त्या १५% करिता पुणे महानगरपालिकेकडून टी.डी.आर.स्वरूपात मोबदला देणे ऐवजी उर्वरित १५% कॉम्पोनंटचे रेडिरेकनर नुसार कॉम्पेनसेशन PHADA मार्फत संबंधित विकसकास देणे योग्य होईल, अशी मा.उप संचालक,नगर रचना विभाग, पुणे यांचेकडे नोंदविलेली हरकत कायम करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. ८६</u>**

**संदर्भ –** १) मे.शासन,नगर विकास विभाग,मंत्रालय मुंबई–३२ यांचे TPB ४३०७/२२२६/CR-३३४/२००७/UD–११, दिनांक १७.७.२००८ अन्वयेचे निदेश.

२) मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१३४०, दि. ४/२/०९ चे पत्र.

३) मा. सुभाष जगताप व मा.अरूण धिमधिमे यांची दि. १७/७/०९ ची उपसूचना.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.९२, दि. १७/७/२००९

----

**मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –**

पुणे शहराच्या विकास योजना आराखडा व विकास नियंत्रण नियमावलीस महाराष्ट्र शासनाने ५ जानेवारी १९८७ रोजी मान्यता दिलेली आहे. मे.महाराष्ट्र शासनामार्फत दि. २३.७.२००७ रोजी गृह विषयक धोरण ठरविण्यात आले आहे. प्रस्तुत धोरणाचा मूळ उद्देश शहरी तसेच ग्रामीण भागामध्ये सर्व सामान्यांना परवडतील अशा किंमतीमध्ये घरे उपलब्ध करून देणे,तसेच कमी उत्पन्न गट आर्थिक दुर्बल घटक यांचे करीता घरांची उपलब्धता करून देणे हा आहे. त्या दृष्टीने जमिनीची नियोजित विभगणी, आराखडा करताना काही टक्के सदनिका, प्लॉटस् ई.डब्ल्यू.एस.एल.आय.जी. व एम.आय.जी करीता ठेवणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने जमिनीची नियोजित विभागणी तसेच आराखडा मंजुर करतानाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नमूद नियमाव्यतिरिक्त मे.शासनाने TPB ४३०७/२२२६/CR–३३४/ २००७/UD–११, दिनांक १७.७.२००८ अन्वये कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेचे निर्देश दिलेले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत.

<u>१)</u> For the sub-division of the land admeasuring 2000 sq.mt.and more,following provision shall be compulsorily provided-

(a) 10% area in the form of 30 to 50 sq.mt.plots for EWS ( Economically Weaker Section) LIG ( Lower Income Group).

(b) 10% area in the form of 50 to 100sq.mt.plots.

<u>२)</u> For the layout of the land,admeasuring 4000 sq.mt.and more,following provision shall be compulsorily provided-

(a) 10% tenements shall be propoed for each EWS ( Economically Weaker Section) LIG ( Lower Income Group) group (30 to 40 sq.mt.)and MIG (Middle Income Group) Group (41 to 60sq.mt.)

प्रस्तुत निर्देशांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना सुकर जावे याकरीता प्रस्तुत निर्देश कायम ठेवून त्यामध्ये काही प्रमाणात फेर बदल करणे योग्य होईल असे प्रशासनाचे मत आहे. सदरचे निर्देशानुसार विकास नियंत्रण नियमावलीत खालीलप्रमाणे नव्याने नियम क्र. १३.१(A) समाविष्ट करण्यात येत आहे.

1) For Subdivision/Layout/Amalgamation of land measuring 2000 sq.mt.& more following provision shall be compulsorily provided.

( a ) 10% area in the form of 30 to 50 sq.mt.tenaments for EWS/LIG.

(b) 10% area in the form of 50 to 100 sq.mt.tenaments & if developer proposes all such tenements in one building out of total Lay-out

buildings such development permission may be granted.
2) In Case of amalgamation of two or more plots total 10%area in the form of 30 to 50 sq.m.tenements,can be shown for EWS/LIG at one side in the layout or in a single building.
3) If number of Developers having different plots (within a distance not exceeding 500 m form each other ) come forward with a combined proposal & 10% of 50 to 100 sq.m.) in one of the plots,then such development permission may be granted. In such a case the FSI on the other plots shall be 1.0 plus the TDR permissible.

अ.क्र.१ मधील १०%क्षेत्र हे २५ ते ३० स्के.मीटर बांधावयाचे सदनिका असाव्यात.तसेच १०%क्षेत्र ३० ते ५० स्के.मी.च्या असाव्यात.

सदरचा नव्याने नियम क्र. १३.१(A) डी.सी.नियमामध्ये समाविष्ट करणेसाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एम.आर.टी.पी.ॲक्ट.१९६६ चे कलम ३७(१) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही करणे आवश्यक आहे. या कार्यवाहीचा भाग म्हणून दैनिंक वर्तमान पत्र व शासकीय राज पत्रात जाहिर प्रकटन देऊन नागरिकांच्या हरकती व सूचना मागविणेसाठी मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.८७**

**संदर्भ –** १) मा. सौ. रत्नप्रभा जगताप व मा. श्रीकांत पाटील यांचे दि. ९/७ /०९ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठ.क्र.९५, दि. २२/७/२००९

----

**शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेनुसार –**

महाराष्ट्र शासनाने गुंठेवारी अधिनियम क्र. २७,२००१ पारित करून १ जानेवारी २००१ पूर्वी बांधलेल्या मिळकती व मोकळे भूखंड जुन्या व नव्या वाढीव हद्दीमध्ये या कायद्यान्वये नियमित करण्याची बऱ्याच नागरिकांची राहून गेले कारणाने सदरची गुंठेवारी कायद्यान्वये नव्या व जुन्या हद्दीमधील बांधकाम व मोकळे भूखंड नियमिती करणासाठी ३१ डिसेंबर २००९ अन्वये शेवटची मुदतवाढ देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**महिला व बाल कल्याण समितीचा ठराव**

**विषय क्र.८८**

**संदर्भ :–** १) मा. सभासद दिपक माधवराव मानकर यांचे दि. ३०.४.२००९ चे पत्र.
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.म.आ./शिक्षणाधिकारी/६८, दि. २६/५/०९ चे पत्र.
३) महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.२७, ८/७/२००९.

----

**मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –**

पुणे महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. ९४ मुलांची कै.मामासाहेब मोहोळ विद्यालय केळेवाडी पुणे ३८ या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २००९–१० पासून इ.८ वी.चे वर्ग सुरू करणेबाबत संदर्भाकिंत पत्रानुसार मा.सभासद दिपक माधवराव मानकर यांनी विनंती केलेली आहे. तसेच कर्वेनगर, कोथरूड, वारजे या मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असलेल्या परीसरात पुणे महानगरपालिकेची एकही माध्यमिक शाळा नाही.

वर नमुद केलेल्या ठिकाणी नवीन माध्यमिक शाळा सुरू करावयाची झाल्यास सुरूवातीस रू.३,०००,००/– इतका खर्च अपेक्षित आहे.

शासनाची मान्यता विनाअनुदानित तत्वावर मिळते मा.मुख्यसभेची मान्यता प्राप्त झाल्यानंतर शाळा सुरू करणेसाठी शासनाची मान्यता घ्यावी लागेल. तसेच सर्व खर्च महानगरपालिकेस करावा लागेल. हा खर्च प्रतीवर्ष वाढत जाणार आहे. तशी दरवर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद करावी लागेल.

नवीन माध्यमिक शाळा सुरू करण्यासाठी सन २००९०–१० च्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच पुरेशा वर्गखोल्याही उपलब्ध आहेत, तरी सदर ठिकाणी माध्यमिक शाळा सुरू करण्यासाठी शासनाकडे परवानगी प्रस्ताव सादर करून शासन परवानगी प्राप्त झालेनंतर माध्यमिक शाळा सुरू करण्याच्या प्रस्तावास शिफारस आहे.

सदर परिसरामध्ये पुणे महानगरपालिकेची अन्य माध्यमिक शाळा नाही.परीसरामध्ये आर्थिक दृष्टया दुर्बल वर्गातील विद्यार्थी बहुसंख्य आहेत. शिवाय इ.८ वी.च्या वर्गासाठी पुरेशी विद्यार्थीसंख्या उपलब्ध आहे. म्हणून पुणे महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. ९४ मुलांची कै.मामासाहेब मोहोळ विद्यालय केळेवाडी या शाळेमध्ये इ.८ वी.चा.वर्ग सुरू करण्याची योग्य ती कार्यपध्दती अवलंबविण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.८९**

**संदर्भ :–** १) मा.बाळासाहेब बोडके व मा.मोहनसिंग राजपाल यांचे दि. २२/ ६ /०९ चे पत्र.
२) महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.२८, दि. ८/७/२००९

----

**महिला व बाल कल्याण समितीत झालेल्या चर्चेनुसार –**

पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये अर्धवेळ ग्रंथपाल या हुद्दावर अनेक सेवक काम करीत आहेत. शाळेतील कामकाज संपूर्ण दिवस चालत असल्याने विद्यार्थांना ग्रंथालयाचा वापर संपूर्ण दिवस करता येणे शक्य असल्याने या सर्व सेवकांना येत्या शैक्षणिक वर्षापासून पूर्णवेळ ग्रंथपाल या हुद्दावर सामावून घेण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.९०**

**संदर्भ :–** १) मा.अति.महा.आयुक्त ( वि ) यांचे मआ/उरा/सेवि/एचओ/१९६,दि.१०/७/२००९ चे पत्र.
२) महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.३५, दि. २२/७/२००९

----

**मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–**

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडे आया ( समय वेतन श्रेणी रू.२५५० ते ३२००+ मान्य भत्ते ) या वर्ग – ४ च्या हुद्दयाचे रिक्त पद भरणेसाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीस आणि प्रतिक्षायादीस व त्यावरील उमेदवारांची सदर पदाच्या जागी उपलब्धतेनुसार व आस्थापना विषयक बाबींचा विचार करून वेळोवेळी नेमणूका करणेस मुंबई प्रांतिक म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खालील प्रतिक्षायादी,निवडयादीवरील उमेदवार रूजू होईपर्यंत किंवा एक वर्षाचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत असित्वात राहील.

**निवडयादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|
| १ | श्रीमती मनिषा लक्ष्मण सुतार | इमाव |
| २ | श्रीमती सोनवणे अलका नारायण | इमाव |
| ३ | श्रीमती मगर ज्योती अशोक | इमाव |
| ४ | श्रीमती शिंदे विजया अशोक | इमाव |
| ५ | श्रीमती यादव पल्लवी रूपेश | इमाव |
| ६ | श्रीमती वाळके उषा सुरेश | इमाव |
| ७ | श्रीमती शिरसाठे रोहिणी रघुनाथ (अपंग ) | इमाव |
| ८ | श्रीमती दुसाने निता वसंत | इमाव |
| ९ | श्रीमती भालेराव ज्योती संजय | इमाव |
| १० | श्रीमती मोरे पल्लवी रमेश | इमाव |
| ११ | श्रीमती गायकवाड कार्तिकी बाळासाहेब | इमाव |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|
| १ | श्रीमती माटे मनिषा रमेश | इमाव |
| २ | श्रीमती भुजबळ युगा किसन | इमाव |
| ३ | श्रीमती भादेकर लक्ष्मी मुरलीधर | इमाव |
| ४ | श्रीमती काळे मनिषा शैलेश | इमाव |

**मा. सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्रं.९१**

संदर्भ :– मा.प्रा.विकास मठकरी, मा.अजित आपटे, मा.विष्णू हरिहर यांची सुचना दि.१७/११/२००८.

–––––

डॉ. शांताराम गजानन महाजन हे गेली साठ वर्षे ग्रंथपालन क्षेत्रात कार्यरत आहेत. ग्रंथपाल म्हणून केसरी मराठा संस्थेत त्यांनी कामास सुरूवात केली. त्यानंतर दीर्घकाळ पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणून काम पाहिले.

पुणे विद्यापीठात जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणून काम करण्याबरोबरच विद्यापीठातील वेगवेगळ्या प्रकारची कामे करण्यामध्ये त्यांचा मोलाचा सहभाग होता.

विद्यापीठ अनुदान मंडळ, महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय शास्त्र परिभाषा कोष, महाराष्ट्र शासन स्टेट लायब्ररी कौन्सिल, युनेस्को अशा विविध संस्थांच्या समित्यांवर ग्रंथपालनाचे अनुषंगाने बरेच कार्य केले आहे.

महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळ कार्यरत राहण्यासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. आत्तापर्यंत त्यांना पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्ठान पुरस्कार, बेस्ट टीचर अॅवॉर्ड, ज्ञानकोशकार केतकर पुरस्कार जयंतराव टिळक स्मृती पुरस्कार, कॅलीबर आंतरराष्ट्रीय ग्रंथालय पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. डॉ. महाजन यांची विविध विषयांवरील २३ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

डॉ. एस. जी. महाजन यांचे कार्य विचारात घेऊन महापालिकेतर्फे मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन खास सत्कार करण्यात यावा.

<u>विषय क्रं.९२</u>

संदर्भ :- मा.प्रा.विकास मठकरी, मा.अजित आपटे, मा.विष्णू हरिहर यांची सुचना दि.१७/११/२००८.

-----

डॉ. शरदचंद्र गोखले हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे समाज शास्त्रज्ञ असून कुशल प्रशासक, संशोधक, संपादक या विविध पदांवर त्यांनी आत्तापर्यंत काम केले आहे. इंटरनॅशनल लेप्रसी असोसिएशनचे दोन वेळा अध्यक्षपद भूषविले आहे. तसेच युनिसेफ, डब्ल्युएचओ व भारत सरकारचे सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केले आहे. त्यांना जी. डी. बिर्ला पुरस्कार, लेप्रसी क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल भारत सरकारने पुरस्कार देऊन गौरविले आहे.

डॉ. शरदचंद्र गोखले हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे समाज शास्त्रज्ञ आहेत. उत्तम लेखक व संपादक म्हणुनही त्यांनी नावलौकिक मिळवला आहे. मराठी दैनिक केसरी या वृत्तपत्राचे संपादक म्हणून त्यांनी काम केले आहे. सकाळ वृत्त समुहाचे विश्वस्त म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

त्यांच्या ह्या विविध अंगी सामाजिक कार्याबद्दल मानपत्र व स्मृती चिन्ह देऊन महापालिकेतर्फे खास सत्कार करण्यात यावा.

<u>विषय क्रं.९३</u>

संदर्भ :- मा. उल्हास उर्फ आबा बागूल – विरोधी पक्षनेते यांची सुचना दि.१८/११/२००८.

-----

वॉर्ड क्रं. ११६ अरण्येश्वर मंदिराजवळ नव्याने बांधण्यात आलेल्या फुलपाखरू गार्डनचे उद्घाटन ज्येष्ठ सिनेअभिनेत्री शर्मिला टागोर यांच्या हस्ते व मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात यावा.

सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

<u>विषय क्रं.९४</u>

संदर्भ :- मा. अविनाश बागवे यांची सुचना दि.२४/११/२००८.

-----

स्वातंत्र्य सैनिक, देशप्रेम व त्यातल्या त्यात मातंग समाजाची अस्मिता असलेले आद्य क्रांतीगुरू लव्हुजी वस्ताद साळवे यांच्या जयंती निमित्त महानगरपालिकेच्या वतीने जो लव्हुजी फेस्टिव्हल आयोजित करण्यात येत आहे.

मा. महापौर यांनी या फेस्टिव्हलची आयोजन समिती स्थापन करावी व त्याचे अध्यक्ष पद आपण स्वीकारावे या समितीमध्ये मातंग समाजाचे पुणे मनपातील सर्व विद्यमान नगरसेवकाचा समावेश करण्यात यावा. या समितीच्या अनुषंगाने या फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात यावे व याबाबत धोरण ठरवावे.

<u>विषय क्रं.९५</u>

संदर्भ :- मा. सौ. वैजयंतीराजे पासलकर यांची सुचना दि.१/१२/२००८.

-----

वॉर्ड क्र. १३९ अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी सुपर येथे दुर्गामाता मंदिराजवळ पुणे महानगरपालिकेच्यावतीने एक सुंदर उद्यान विकसीत करण्यात आले असून सदरचे उद्यानाचे उद्घाटन मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात यावे.

सदर उद्यानाचे उद्घाटन मा. सुरेशभाई कलमाडी, खासदार, पुणे यांचे हस्ते करण्यात येवून सदर प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. उल्हासदादा पवार, आमदार व स्थानिक आमदार मा. रमेश बागवे यांना बोलविण्यात यावे.

<u>विषय क्रं.९६</u>

संदर्भ :– मा. ॲड्. अविनाश साळवे यांची सुचना दि.१५/१२/२००८.

–––––

पुणे महानगरपालिकेतर्फे वॉर्ड क्र. १८ ( येरवडा गांव ) येथील स. नं. ४ एअरपोर्ट रोड येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन आणि वीर लहुजी वस्ताद साळवे प्रशाला विकास कामाचे भूमीपूजन समारंभ रविवार दि. २२ फेब्रुवारी २००९ रोजी दुपारी २.०० (दोन) वाजता मा. ना. दादासाहेब ऊर्फ रा. सु. गवई, राज्यपाल, केरळ राज्य यांच्या शुभहस्ते व मा. ना. अजितदादा पवार, जलसंपदा मंत्री व पालकमंत्री, पुणे जिल्हा, मा. सुरेशभाई कलमाडी, खासदार, मा. लक्ष्मणराव ढोबळे, अध्यक्ष, खादी ग्रामोद्योग महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मा. सौ. कमल ढोलेपाटील, आमदार व मा. पी. ए. इनामदार, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तसेच मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर, मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती व पक्षनेते शिवसेना, मा. अनिल शिवाजीराव भोसले, सभागृह नेता, मा. उल्हास उर्फ आबा बागुल, विरोधी पक्षनेते, मा. प्रा. विकास मठकरी, पक्षनेते, भाजपा, मा. रविंद्र धंगेकर, पक्षनेते मनसे, मा. महेश लडकत, अध्यक्ष, शिक्षण मंडळ, मा. राजेंद्र एंडल, अध्यक्ष, संगमवाडी प्रभाग समिती, मा. गणेश बिडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती, मा. ॲड्. अविनाश साळवे, स्थानिक नगरसेवक यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आला त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

<u>विषय क्रं.९७</u>

संदर्भ :– मा. प्रा. विकास मठकरी, मा. अशोक येनपुरे, मा. सौ. मनिषा घाटे, मा. विष्णू हरिहर यांचे दिनांक १७/१२/२००८ चे पत्र, मा. चंद्रकांत मोकाटे उपमहापौर, पुणे, मा. अनिल शिवाजीराव भोसले, सभागृह नेता यांचे दिनांक १६/०१/२००९, मा. रविंद्र धंगेकर यांचे दिनांक १७/१२/२००८ चे पत्र, मा. अनिल शिवाजीराव भोसले, सभागृह नेते, मा.ॲड्. निलेश निकम, अध्यक्ष स्थायी समिती यांची सुचना दिनांक ०६/०७/२००९.

–––––

अखिल भारतीय मराठा महासंघ, रायरेश्वर ब्लॉक नं. जी–१३५८ सदाशिव पेठ, गद्रे चेंबर्स १ ला मजला, बाजीराव रोड, पुणे – ३० व श्री. राजाभाऊ चव्हाण यांचे वतीने राजर्षी श्री शाहु महाराज यांचे तैलचित्र पुणे महानगरपालिकेस भेट देण्यात येत असून सदरचे तैलचित्र महापालिकेने स्विकारुन ते पुणे मनपा भवन आवारात योग्य ठिकाणी समारंभपूर्वक लावण्यात यावे.

<u>विषय क्रं.९८</u>

संदर्भ :– मा. बाळासाहेब कापरे, मा. बंडू उर्फ शंकर केमसे यांची सुचना दिनांक ७/१/२००९.

–––––

पुणे महानगरपालिकेतर्फे वॉर्ड क्र. १२८ विठ्ठलवाडी मध्ये स. नं. ९ येथे नव्याने बांधण्यात आलेल्या अग्निशामक केंद्राचे उद्घाटन सोमवार दिनांक २६ जानेवारी २००९ रोजी दुपारी २.०० (दोन) वाजता ना. अजितदादा पवार, जलसंपदा मंत्री व पालक मंत्री, पुणे जिल्हा यांचे शुभहस्ते व मा. शिवाजीराव आढळराव – पाटील, खासदार, मा. शरद ढमाले, आमदार तसेच मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर, मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती व पक्षनेते शिवसेना, मा. अनिल शिवाजीराव भोसले, सभागृह नेता, मा. उल्हास उर्फ आबा बागुल, विरोधी पक्षनेते, मा. प्रा. विकास मठकरी, पक्षनेते, भाजपा, मा. रविंद्र धंगेकर, पक्षनेते मनसे, मा. महेश लडकत, अध्यक्ष, शिक्षण मंडळ, मा. बाळासाहेब कापरे, अध्यक्ष, टिळक रोड प्रभाग समिती व स्थानिक नगरसेवक, मा. गणेश बिडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती, मा. शैलेश चरवड, नगरसेवक, मा. विकास दांगट, नगरसेवक, मा. अक्रुरशेठ कुदळे, नगरसेवक, मा. प्रसन्न जगताप, नगरसेवक यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आला त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

<u>विषय क्रं.९९</u>

संदर्भ :– मा. प्रा. विकास मठकरी यांची सुचना दिनांक २९/१/२००९.

–––––

शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे यांनी संपूर्ण आयुष्य शिवचरित्र अभ्यास – प्रसार आणि प्रचारासाठी वाहून घेतले आहे. स्वातंत्र्योत्तर पिढीला त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा करुन दिलेला परिचय दिर्घ काळ संस्कार करणारा आणि देशभक्ती फुलविणारा ठरला. शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे यांचा मनपातर्फे मानपत्र, स्मृतिचिन्ह व शाल देवून विशेष भव्य नागरी सत्कार करण्यात यावा.

कार्यक्रमाचे नियोजनाचे सर्व अधिकार मा. महापौर, पुणे यांना देण्यात यावेत.

**<u>विषय क्रं.१००</u>**

संदर्भ :- मा. शंकर उर्फ बंडू केमसे, मा. सुनिल गोगले यांची सुचना दिनांक ३१/१/२००९.

-----

पुणे महानगरपालिकेतर्फे वॉर्ड क्र. ६१, वेदभवन, भुसारी कॉलनी येथील उद्यानाचा '' भारतरत्न पंडित भीमसेन जोशी '' असा नामकरण व उद्‌घाटन समारंभ सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी २००९ रोजी मा. सौ. सुप्रिया सुळे, खासदार यांच्या शुभहस्ते व मा. शिवाजीराव आढळराव - पाटील, खासदार, मा. शरद ढमाले, आमदार, मा. जयंत भीमसेन जोशी तसेच मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर, मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती व पक्षनेते शिवसेना, मा. अनिल शिवाजीराव भोसले, सभागृह नेता, मा. उल्हास उर्फ आबा बागुल, विरोधी पक्षनेते, मा. प्रा. विकास मठकरी, पक्षनेते, भाजपा, मा. रविंद्र धंगेकर, पक्षनेते मनसे, मा. महेश लडकत, अध्यक्ष, शिक्षण मंडळ, मा. मुरलीधर मोहोळ, अध्यक्ष, कर्वे रोड प्रभाग समिती, मा. गणेश बिडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती, मा. दिपक उर्फ बाळसासाहेब बोडके, अध्यक्ष, नाव समिती, मा. शंकर उर्फ बंडू केमसे, स्थानिक नगरसेवक यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आला त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**<u>विषय क्रं.१०१</u>**

संदर्भ :- मा. सौ. रजनी त्रिभुवन, माजी महापौर, मा. अविनाश बागवे, मा. दिपक मानकर यांची सुचना दिनांक ९/२/२००९.

-----

झी मराठी वाहिनीवर सा.रे.ग.म.प. या लिटल चॅम्स या कार्यक्रमामध्ये पुणे जिल्हातील आळंदी देवाची येथे राहणाऱ्या कु. कार्तिकी गायकवाड या नवोदित गायिकेने प्रथम क्रमांक पटकविला त्याबद्दल पुणे महानगरपालिकेतर्फे कु. कार्तिकी गायकवाड या नवोदित गायिकेचा पंडित भिमसेनजी जोशी यांच्या शुभहस्ते तसेच पंडित ह. मंगेशकर, ज्येष्ठ गायिका देवकी पंडित, ज्येष्ठ गायक मा. सुरेश वाडकर तसेच पुण्यातील संगीत क्षेत्रातील नामांकित व्यक्तींच्या प्रमुख उपस्थितीत खास सत्कार करण्यात यावा.

**<u>विषय क्रं.१०२</u>**

संदर्भ :- मा.सुनिल बनकर, मा.महादेव बाबर, मा.दिलीप उंबरकर, यांची सुचना दिनांक१०/२/२००९.

-----

कु. कार्तिकी गायकवाड व कु. आर्या आंबेकर या सा.रे.ग.म.प. आयडिया या कार्यक्रमा अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्र व भारतात आपल्या पुण्याचे नाव मोठे केले या दोन चिमुकल्या गायकांचे पुणे महानगरपालिकच्यावतीने मा. महापौर यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात यावा.

**<u>विषय क्रं.१०३</u>**

संदर्भ :- मा. आरिफ बागवान, मा. श्रीकांत पाटील यांची सुचना दिनांक २४/२/२००९.

-----

ए. आर. रेहमान, गुलजार, रेसूल पोकुट्टी यांनी चित्रपट सृष्टीमध्ये ऑस्कर पारितोषिक पटकावून भारताचे नाव सर्व जगभर प्रसिध्द केल्यामुळे त्यांचा सर्व स्लमडॉग टिमचे पुणे महानगरपालिकेच्या वतीने मानचिन्ह देवून खास सत्कार करण्यात यावा.

**<u>विषय क्रं.१०४</u>**

संदर्भ :- मा. प्रा. विकास मठकरी, यांचे दिनांक २२/०५/२००९ चे पत्र, मा. शिवाजी बांगर,मा. सौ. शैलजा खेडेकर यांची सुचना दिनांक २४/६/२००९.

-----

जगातील सर्वात तरूण एव्हरेस्टवीर ठरलेली कृष्णा पाटील ( वय १९ ) या पुणेकर युवतीच्या उल्लेखनिय, गौरवास्पद-एव्हरेस्ट चढाई बद्दल पुणे मनपातर्फे तिचा विशेष/खास नागरी सत्कार करण्यात यावा. या कार्यक्रमासाठी पुण्याचाच एव्हरेस्टवीर सुरेंद्र पाटील आणि ट्रेकिंग विश्वाचे भिष्मपितामह एन. के. महाजन ( वय ८५ ) यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करावे.

तसेच एव्हरेस्ट शिखर सर केल्याबद्दल कृष्णा पाटील यांना रक्कम रूपये ५ लाख व स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात यावे.

सदरचा कार्यक्रम नेहरू स्टेडियमवर पुण्यातील जास्त विद्यार्थांना आमंत्रित करून करण्यात यावा.

<u>विषय क्रं.१०५</u>

संदर्भ :– मा. उल्हास उर्फ आबा बागुल – विरोधी पक्षनेते, मा. डॉ. सिध्दार्थ धेंडे, मा. शिवाजी शिंदे, मा. शेलेंद्र नलावडे यांची सुचना दिनांक २६/२/२००९.

–––––

राष्ट्रपती पुरस्कार विजेते, लोककलावंत सुप्रसिध्द गोंधळी कै. केशवराव लक्ष्मणराव बडगे यांचे नुकतेच निधन झाले ते एक जातीवंत लोककलांवत व गोंधळी होते त्यांनी आजपर्यंत संपुर्ण भारतातच नव्हे तर परदेशातही अनेक कार्यक्रम केले, त्यांनी अनेक नामवंत कलाकरांना साथ संगत केली, त्यात प्रामुख्याने पं. भिमसेन जोशी, स्व. सुधीरजी फडके, झाकीर हुसेन यांच्या समवेत तबल्याची साथ केली.

कै. केशवराव बडगे यांना राष्ट्रपती पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले तसेच महाराष्ट्र शासनाचा लोककलावंत म्हणून पुरस्कार मिळाला आपल्या पुणे मनपाने मानपत्र तसेच पठ्ठे बापूराव पुरस्कार देवून गौरविले आहे. तसेच श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट मार्फत गेली २५ वर्षे संगीत महोत्सवाचे संयोजन केले व पुणे नवरात्र महोत्सवाचे लोकसंगीताचे संयोजक म्हणून गेली १५ वर्षे काम केले आहे.

तरी पुणे मनपाने अशा गुणवंत कलाकराचे चिरंतर नाव रहावे म्हणून डहाणूकर चौकात कै. केशवराव लक्ष्मण बडगे असे नांव देण्यात यावे तसेच त्यांच्याच नावांने पुणे मनपाने पुरस्कार चालू करण्यात यावा.

तसेच बालगंधर्व पुरस्कार वितरणाचे वेळी इतर उदयोन्मुख कलाकारांबरोबर स्वर्गीय केशवराव बडगे यांच्या नावाचा ६ वा पुरस्कार देण्यात यावा.

<u>विषय क्रं.१०६</u>

संदर्भ :– मा. चंद्रकांत मोकाटे – उपमहापौर, मा. सचिन भगत यांची सुचना दिनांक ६/६/२००९.

–––––

वॉर्ड क्र. १०६ मधील कोथरूड येथे नव्याने बांधण्यात आलेल्या बस स्टॅण्डचे उद्घाटन व कै. धोंडीबा भिवा सुतार असे नामकरण समारंभ मंगळवार, दिनांक ०९ जून २००९ रोजी मा. अरविंदभाई सावंत, आमदार व पुणे जिल्हा शिवसेना संपर्क नेते यांच्या हस्ते स्थानिक खासदार व आमदार मा. सर्व पदाधिकारी मनपा, पक्षनेते व स्थानिक नगरसेवक यांच्या उपस्थितीत करण्यात यावा.

सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावे.

<u>विषय क्रं.१०७</u>

संदर्भ :– १) मा. बंडू उर्फ सुनिल गायकवाड व मा. ॲड्. निलेश निकम – अध्यक्ष स्थायी समिती यांची सुचना दिनांक ९/६/२००९.

२) मा.बंडू उर्फ सुनिल गायकवाड व मा.विरेंद्र किराड यांची सूचना दिनांक २५/२/२००९

–––––

मुंढवा येथील मैला शुध्दीकरण केंद्राचे उद्घाटन मा. ना. शरदचंद्रजी पवार साहेब, केंद्रीय कृषी मंत्री, भारत सरकार यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. उद्घाटनाचे अध्यक्ष मा. सौ. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे, मा. ना. अजितदादा पवार, जलसंपदा मंत्री, पालकमंत्री पुणे जिल्हा व मा. खासदार सुरेशभाई कलमाडी, मा. आमदार बाळासाहेब शिवरकर व स्थानिक नगरसेवक मा. बंडू उर्फ सुनिल गायकवाड यांच्या उपस्थितीत करण्यात यावा.

तसेच उद्घाटनाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

<u>विषय क्रं.१०८</u>

संदर्भ :– मा. सौ. रेखा चंद्रकांत टिंगरे, मा. भिमराव खरात यांची सुचना दिनांक २९/६/२००९.

–––––

वॉर्ड क्र. १ धानोरी याठिकाणी पुणे महानगरपालिकेच्या वतीने अयप्पा स्वामी उद्यान विकसित करण्यात आलेले आहे. सदर उद्यानाचा उद्घाटनाचा कार्यक्रम मा. ना. अजितदादा पवार, जलसंपदा व पालक मंत्री पुणे जिल्हा यांचे शुभहस्ते मा. सौ. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे यांचे प्रमुख उपस्थितीत, मा. अनिल भोसले, सभागृह नेते, मा. विलास लांडे, आमदार व स्थानिक नगरसेवक व पुणे मनपा पदाधिकारी यांचे उपस्थितीत करण्यात यावा. सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

**विषय क्रं.१०९**

संदर्भ :– मा. उल्हास उर्फ आबा बागुल व मा. अरविंद शिंदे यांची सुचना दिनांक २४/६/२००९.

-----

सुप्रसिध्द गायिका आणि गायन सम्राज्ञी आदरणीय श्रीमती उषा दिनानाथ मंगेशकर यांनी गेल्या अनेक वर्षापासून चित्रपटातून अनेक गाणी गायली असून शास्त्रीय संगीतामध्ये निपुण आहे. त्यांचे गाणे अत्यंत नावाजलेले असून लोकगीते ही गायलेली आहे.

तरी मा. श्रीमती उषा दिनानाथ मंगेशकर त्यांच्या पंच्याहत्तरीचे निमित्त साधून पुणे महानगरपालिकेतर्फे नागरी सत्कार करण्यात यावा.

**विषय क्रं.११०**

संदर्भ :– मा. अनिल भोसले, सभागृह नेते, मा. उल्हास उर्फ आबा बागुल व मा. विरेंद्र किराड यांची सुचना दिनांक २/६/२००९.

-----

पुणे महानगरपालिकेतर्फे कात्रज येथे सुमारे दीडशे एकर जागेत राजीव गांधी प्राणी संग्रालयात अत्यंत सुंदर व देखणे असे विविध प्रकारचे प्राणी या संग्रालयात आहेत.

पुणे शहरात देशाचे दिवंगत पंतप्रधान संगणक क्रांतीचे जनक स्व. राजीवजी गांधी यांचे नांव सदर उद्यानास आहे. स्व. राजीव गांधी यांचे पुणे शहरात कुठेही स्मारक अथवा पुतळा नाही. म्हणूनच माजी नगरसेवक गोपाळ तिवारी व त्यांच्या मित्र परिवारातर्फे स्व. राजीव गांधी यांचा पुतळा दिल्ली येथील विख्यात शिल्पकार पद्मश्री राम सुतार यांचेकडून तीन फुटी ब्राँझचा पुतळा बनवून घेतला असून त्यास लागणारी कला संचनालय महाराष्ट्र शासन यांची मान्यता देखील मिळालेली आहे.

स्व. राजीव गांधी यांचा अर्ध पुतळा स्वीकार करून कात्रज येथील पुणे मनपाचे स्व. राजीव गांधी झु लॉजिकल पार्क व ॲनिमल रिसर्च सेंटर येथील जागेत प्रवेशव्दाराच्या समोरील दर्शनी भागात त्याची स्थापना करावी.

या कार्यक्रमास मा. श्रीमती सोनियाजी गांधी, अध्यक्षा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांना किंवा त्यांच्या कुटूंबातील अन्य कोणालाही आमंत्रित करण्यात यावेत. तसेच संगणक क्षेत्रातील स्व. राजीव गांधी यांचे एकेकाळचे सहकारी सॅम पित्रोडा यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. ना. शरदरावजी पवार, कृषी मंत्री, भारत सरकार, मा. सुरेशजी कलमाडी, खासदार, पुणे, मा. अजितदादा पवार, जलसंपदा व पालकमंत्री, पुणे जिल्हा यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात यावा. तसेच माजी नगरसेवक श्री. गोपाळ तिवारी यांनाही आमंत्रित करण्यात यावेत.

तसेच छत्रपती शाहु महाराज व राजीव गांधी हे दोन ही पुतळे बसविण्यात यावेत.

सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

**विषय क्रं.१११**

संदर्भ :– मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर व मा. श्रीकांत पुजारी यांची सुचना दिनांक१७/१०/२००८.

-----

भारताचे उपपंतप्रधान कै. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मरणार्थ कोथरूड पुणे येथे महानगरपालिकेच्यावतीने नाट्यगृह बांधण्यात आले आहे. या नाट्यगृहाच्या वर्धापन दिना निमित्त सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तिस कै. यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार, रोख रक्कम रूपये ५०,०००/– व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात यावे. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या युवा कार्यकर्त्यास पुरस्कार देण्यात यावा. सदरचा पुरस्कार हा कै. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मरणार्थ दरवर्षी २५ नोव्हेंबर रोजी देण्यात यावा.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रक्कम रूपये १,७५,०००/– उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच कार्यक्रम फक्त महापालिकेचा म्हणून करावा व कार्यक्रमाचा खर्च किती करावयाचा याचे अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

कार्यक्रमाचे नियोजन प्रबोधन विचारधारा व पुणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रं.११२**

संदर्भ :– मा.अनिल भोसले, सभागृह नेते व मा.ॲड्.निलेश निकम, अध्यक्ष स्थायी समिती यांची सुचना दिनांक ६/७/२००९.

-----

भारतीय संविधान उद्देशिका पाटीचे अनावरण पुणे महानगरपालिका प्रांगणात ग्रॅनॉईट पाटीवर कोरून बसविण्यात यावे.

सदरचा कार्यक्रम मा. ना. शरद पवार, कृषी मंत्री, भारत सरकार यांचे शुभहस्ते करण्यात यावा. तसेच सदरचे कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

**विषय क्रं.११३**

संदर्भ :- मा.ॲड्.निलेश निकम, अध्यक्ष स्थायी समिती, मा.अनिल भोसले, सभागृह नेते, मा. बाबु वागसकर, मा. अशोक येनपुरे, मा. उज्वल केसकर यांची सुचना दिनांक ७/७/२००९.

-----

पुणे महानगरपालिकेच्या विशेष समित्यांच्या सभा ज्या सभागृहात भरतात त्या सभागृहाला नगरपालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष प्र. के. उर्फ आचार्य अत्रे यांचे नांव देण्यात यावे. तसेच त्या ठिकाणी तैलचित्र लावण्यात यावे.

**विषय क्रं.११४**

संदर्भ :- मा.पृथ्वीराज सुतार यांची सुचना दिनांक २३/७/२००९.

-----

पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते कर्तबगार विधीतज्ञ ॲड.नंदकुमार फडके यांची महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ही सभा त्यांचे खास अभिनंदन करत आहे. सदरचा ठराव मा.महापौर यांनी श्री.ॲड.नंदकुमार फडके यांचेकडे पाठवावा.

**विषय क्रं.११५**

संदर्भ :- मा.पृथ्वीराज सुतार यांची सुचना दिनांक २३/७/२००९.

-----

पुणेकरांचे आवडते क्रिकेटपटू आपल्या देशाचे माजी कर्णधार पुण्याचे नागरिक माजी क्रिकेट कसोटीपटू श्री.चंदु बोर्डे यांनी वयाने पंच्च्याहत्तरीत पदार्पण केले आहे. तरी ही सभा त्यांचे खास अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा चिंतीत आहे. सदरचा ठराव मा.महापौर यांनी श्री.चंदु बोर्डे यांचेकडे पाठवावा.

## मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र

**विषय क्रं.११६**

पुणे मनपा प्रशासनाकडे ''सहाय्यक संचालक, नगररचना'' या पदावर श्री. सु. रा. किणी यांची महाराष्ट्र शासन निर्णय क्र. टीपीव्ही-१२०३/२३५४/प्र.क्र.२८६/०३/नवि-२७, दि.२/८/२००८ रोजी बदलीने प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली असून ते दिनांक ८/८/२००८ रोजी मध्यान्हपूर्व रुजू झाले असून त्यांनी प्रत्यक्ष काम पुणे व पिंपरी-चिंचवड झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे करावयाचे असलेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जावक क्र. मआ/सेवि/१८६, दि. ७/७/२००९ चे पत्र.

**विषय क्रं.११७**

मौजे उरूळी देवाची व फुरसुंगी, ता.हेवली येथील ग्रामस्थांनी कचरा डेपोबाबत दि. ७/५/०९ पासून सुरू केलेल्या आंदोलनाच्या संदर्भात ग्रामस्थांनी केलेल्या मागण्यांबाबत मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र.मआ/घनकचरा/२०७, दि. २३/७/२००९ चे पत्र.

## संकिर्ण

**विषय क्रं.११८**

माहे जून २००९ ते ऑगस्ट २००९ अखेरपर्यंत म.न.पा. मुख्य सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मान्य करणेबाबतचे मा. दिपक मानकर यांचे दि. १५/७/२००९ चे पत्र.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :- ३०/७/२००९.

**सुनिल पारखी,**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टीप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :– ६/८/२००९

–: परिपत्र :–

पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्रं. १ (के) अन्वये शुक्रवार दि. ७/८/२००९ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता भरणाऱ्या माहे ऑगस्ट २००९ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यासाठी आलेले विषय.

विषय क्र. १

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उआ/से/२९३७ दि. ३०/१२/२००८ चे कार्यालयीन आदेश.

२) मा.नगरसचिव यांचे क्र. १८८४ दि. २९/७/२००९ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठ.क्र. ४६४, दि. ४/८/२००९

–––––

मा.नगरसचिव यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेच्या नगरसचिव कार्यालयाकडील नगरसचिव (वेतनश्रेणी रुपये १०६५०–३५०–१४१५०–४००–२२१५०+स्पेशल पे+मोटारकार अलौन्स+मान्य भत्ते) या रिक्त पदी कार्यालयीन सोयीसाठी श्री.पारखी सुनिल नारायण, हुद्दा–उपनगरसचिव (वेतनश्रेणी रुपये ६५००–२००–८५००–२२५–११२००–२५०–१४२००–२७५–१४७५०+स्पेशल पे+मान्य भत्ते) यांनी स्वत:चे काम सांभाळून नगरसचिव या पदाचे काम पाहिले असल्याने श्री.पारखी सुनिल नारायण, उपनगरसचिव यांना दि. १/१/२००९ ते १२/७/२००९ पर्यंत मान्य धोरणानुसार ५% विशेष वेतन व मोटारकार अलौन्स देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००९ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

विषय क्र. २

संदर्भ :– १) मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/२३७ दि. २२/७/२००९ चे पत्र.

२) मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता, मा.विरेंद्र किराड, मा.विजय देशमुख व मा.अशोक येनपुरे यांची दि. ४/८/२००९ ची उपसूचना.

३) मा.स्थायी समिती ठ.क्र. ४७२, दि. ४/८/२००९.

––––

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील द्रितीय श्रेणीतील सिनिअर ऑडीटर हे पद वगळता तृतीय श्रेणीतील सिनिअर असिस्टंट ऑडीटर, ज्युनिअर असिस्टंट ऑडीटर, सब ऑडीटर या ऑडीट संवर्गातील बढतीच्या पदावर नेमणूका करण्यासाठी खालील 'ब,क,ड' मधील शिफारस केलेल्या निवड यादीतील बढतीच्या पदावरील नेमणूका करण्यासाठी खालील सेवकांचा दिलेला क्रम,मागासवर्गीय अनुशेष व आरक्षण,शासनाकडील वेळोवेळीचे आदेश,रिक्त जागांची उपलब्धता इ.आस्थापनाविषयक बाबीचा विचार करुन मा.मुख्य लेखापरीक्षक यांनी बढतीने नेमणूका करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१)व (२) नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

ब) सिनिअर असिस्टंट ऑडीटर (वेतनश्रेणी रु.५५०० ते १२८५० + मान्य भत्ते)

ज्युनि.असि.ऑडिटर (वेतनश्रेणी रु.५३०० ते ११८०० + मान्य भत्ते) या संवर्गातून सिनिअर असि.ऑडिटर (वेतनश्रेणी रु.५५०० ते १२८५० + मान्य भत्ते) या संवर्गात बढतीसाठी निवडयादी खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | सेवकाचे नांव व गट | शैक्षणिक पात्रता | आवश्यक शैक्षणिक पात्रता | ज्युनि.असि.ऑडिटर संवर्गातील नेमणूक दि. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.कुलकर्णी सतिश काशिनाथ (खुला) | बी.कॉम. एल.एस.जी.डी | पदवीधर | २९.०७.२००६ |
| २ | श्रीमती यंदे सुजाता धनंजय (खुला) | एम.कॉम. एल.एस.जी.डी | पदवीधर | २९.०७.२००६ |
| ३ | श्रीमती बिद्री हेमलता प्रकाश (अ.जा.) | बी.ए.एलएलबीएलजीएस डी.टी.एल.एसजीडी | —''— | २९.०७.२००६ |

**<u>क) ज्युनिअर असिस्टंट ऑडीटर (वेतनश्रेणी रु.५३०० ते ११८०० + मान्य भत्ते)</u>**

सबऑडिटर (वेतनश्रेणी रु.५१५० ते ११३५० + मान्य भत्ते) या संवर्गातून ज्युनिअर असि.ऑडिटर (वेतनश्रेणी रु.५३०० ते ११८०० + मान्य भत्ते)या संवर्गात बढतीसाठी निवडसूची खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | सेवकाचे नांव व गट | शैक्षणिक पात्रता | आवश्यक शैक्षणिक पात्रता | सबऑडिटर संवर्गातील नेमणूक दि. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.कदम अरुण लक्ष्मण (खुला) | बी.कॉम. एलएसजीडी, | पदवीधर | १९.११.१९८७ |
| २ | श्रीमती कुलकर्णी सुलभा श्रीकांत (खुला) | बी.कॉम. एलएसजीडी, एलजीएस | —''— | २९.०७.२००६ |
| ३ | श्रीमती कुलकर्णी सुनिता प्रदीप (खुला) | बी.कॉम. एलएसजीडी | —''— | २९.०७.२००६ |
| ४ | श्री.लोखंडे दिलीप विष्णू (खुला) | बी.ए. एलएसजीडी | —''— | २९.०७.२००६ |
| ५ | श्री.कोटस्थाने दिपक दुर्गादास (खुला) | बी.ए.एलएसजीडी | पदवीधर | २९.०७.२००६ |
| ६ | श्रीमती गांगला शैला सुनिल (खुला) | बी.ए.एलएसजीडी | —''— | २९.०७.२००६ |
| ७ | श्री. अत्रे विनायक गोविंद (खुला) | बी.ए. एलएसजीडी | —''— | २९.०७.२००६ |
| ८ | श्री.कदम चंद्रकांत भगवान (खुला) | बी.कॉम. एल.एस.जी.डी. | —''— | २९.०७.२००६ |
| ९ | श्री.परांजपे शशिकांत चिंतामण (खुला) | बी.ए. एल.एस.जी.डी. डी.एलएल ॲण्ड लॉ. | —''— | २९.०७.२००६ |
| १० | श्री.केंगले सुरेश भोरूजी (अ.ज.) | बी.कॉम. | —''— | २९.०७.२००६ |
| ११ | श्रीमती हिंगे कुसुम सूर्यकांत (खुला) | बी.ए. एल.एस.जी.डी. | —''— | २९.०७.२००६ |
| १२ | श्रीमती सोनावणे विजयश्री महादेव (अ.जा.) | बी.ए. एल.एस.जी.डी. | —''— | २९.०७.२००६ |
| १३ | श्रीमती थोरात गौरी शंकर (खुला) | बी.कॉम. एल.एस.जी.डी. | —''— | २९.०७.२००६ |

**ड <u>) सबऑडिटर (वेतनश्रेणी रु. ५१५० ते ११३५० + मान्य भत्ते)</u>**

सिनि.ग्रेड लेखनिक (वेतनश्रेणी रू. ४३०० ते १००४५ + मान्य भत्ते) या संवर्गातून सब ऑडिटर (वेतनश्रेणी रु.५१५० ते ११३५० + मान्य भत्ते ) या संवर्गात बढतीसाठी निवडसूची खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | सेवकाचे नांव व गट | शैक्षणिक पात्रता | सिनि.ग्रेड लेखनिक संवर्गातील नेमणूक दि. |
|---|---|---|---|
| १ | श्री.शेळके विश्वनाथ किसन (खुला) | बी.ए. एलएसजीडी | ०१.११.२००३ |
| २ | श्रीमती झेंडे माधुरी चंद्रकांत (खुला) | बी.ए. एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ३ | श्री.साळुंके सुरेश श्रीकृष्ण (खुला) | बी.कॉम.एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ४ | श्री.दरेकर भिमराव रामचंद्र (खुला) | बी.कॉम.एलएसजीडी | २१.०८.२००६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | श्रीमती दवे रचना अरविंद (खुला) | बी.ए.एल.एस.जी.डी. | २१.०८.२००६ |
| ६ | श्रीमती ढेकणे अश्विनी गोविंद (खुला) | एम.कॉम. एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ७ | श्रीमती ताकवले साधना विजय (खुला) | बी.ए.एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ८ | श्रीमती अत्रे वर्षा दत्तात्रय (खुला) | बी.ए.एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ९ | श्री.जगताप संजय सदाशिव (खुला) | एम.कॉम.एलएसजीडी एलजीएस | २१.०८.२००६ |
| १० | श्री.डोळे हेमंत रामचंद्र (खुला) | बी.कॉम. एलएसजीडी | २२.०८.२००६ |

**(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००९ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)**

**<u>विषय क्र. ३</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.मालन भिंताडे व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि. ४/८/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठ.क्र. ४७८, दि. ४/८/२००९

-----

**स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –**

वॉर्ड क्रं. १३३ आंबेगाव पठार स.नं. १८ ते २२ या भागातील रस्ते ग्राऊट करणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, धनकवडी क्षेत्रिय कार्यालय, सीई २० अे १७६/डब्ल्यू२–१४९६, सीपीटीएल–९, ५०/५१, वॉर्ड क्र. १४२ राजीव गांधी उद्यान येथील विविध ठिकाणचे रस्ते ग्राऊट करुन डांबरीकरण करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. १३३ आंबेगाव पठार स.नं. १८ ते २२ या भागातील रस्ते ग्राऊट करणे | --- | १० लाख |

**(टिप :– सदरचा विषय माहे ऑगस्ट २००९ च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**